**Q.P. Code:00004849**

[वेळ: ३ तास] [ गुण:१०० ]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**
**३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र.१ अ** ‘कविता’ या साहित्यप्रकारच्या विविध व्याख्या सांगून कवितेचे स्वरूप स्पष्ट करा. २०

**किंवा**

**ब.** आधुनिक मराठी कवितेच्या विकासाचे ठळक टप्पे सविस्तर स्पष्ट करा.

**प्र.२ अ** कवयित्री पद्मा गोळे यांच्या कवितेतून येणारे स्त्री-जीवन स्पष्ट करा. २०

**किंवा**

**ब** कवी मंगेश पाडगावकरांच्या तुम्ही अभ्यासलेल्या कवितांचे स्वरूप-वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र.३ अ** अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रे तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे विशद करा. २०

**किंवा**

**ब** ‘निवडक मराठी कविता’ मधील अनुराधा पाटील यांच्या कवितांचा आढावा घ्या.

**प्र.४ प्रत्येक गटातील एक टीप लिहा.** ३०

**अ १.** मराठी कवितेची परंपरा

**किंवा**

**२.** कवितेचे संरचनेनुसार वर्गीकरण

**ब १.** बहिणाबाई चौधरी

**किंवा**

**२.** बा.सी.मर्ढेकरांची कविता

**क १.** इंद्रजित भालेराव- ग्रामीण जीवनाचे दर्शन

**किंवा**

**२.** वीरधवल परब यांचा परिचय

X0279YF012EEX0279YF012EEX0279YF012EEX0279YF012EE

**Q.P. Code:00004849**

**प्र.५ एका वाक्यात उत्तरे लिहा.** **१०**

१. नवकाव्याचे जनक कोणास म्हणतात?
२. ‘वाक्यं रसात्मक काव्याम’ ही कवितेची व्याख्या कोणत्या साहित्य मिमांसकाने केली आहे?
३. ‘पिपात मेले ओल्या उंदीर’ ही कविता कोणत्या कवीची आहे?
४. कवी मंगेश पाडगावकर यांच्या कोणत्याही दोन कवितांची नावे लिहा.
५. “मन मोकाट मोकाट त्याले ठायी ठायी वाटा” असे कोणत्या कवयित्रीने म्हटले आहे?
६. ‘आईपणाची भीती’ ही कविता कोणाची आहे?
७. ‘टाहो’ हा काव्यसंग्रह कोणत्या कवीचा आहे?
८. कवी अरुण काळे यांच्या ‘जग बदलत चाललं आहे’ हा विषय कोणत्या कवितेत आलेला आहे?
९. ‘माहिती तंत्रज्ञान’ हे मिळालेले वरदान कवी अरुण काळे यांच्या कोणत्या कवितेत आहे?
१० ‘वय वाढत जातंय आपलं’ या कवितेचे कवी कोण?

X0279YF012EEX0279YF012EEX0279YF012EEX0279YF012EE